Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1

JOURNAL OF EAST-WEST THOUGHT

Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# भारतातील माहिती अधिकार विकासात महिलांचे योगदान

**नितीन राजाराम वाडीले,** संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग व संशोधन केंद्र के. जे. सोमैय्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कोपरगाव जि. अहमदनगर
**डॉ. विलास भारतराव बनसोडे,** संशोधक मार्गदर्शक, राज्यशास्त्र विभाग, दादापाटील राजळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आदिनाथनगर, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर

**प्रस्तावना**

ॲरिस्टॉटलच्या मते, "मानव हा केवळ समाजशील प्राणी नाही तर तो राजकीय देखील आहे". नैसर्गिक विकासातून कुटुंब पद्धती निर्माण झाली आणि तदनंतर ग्रामीण व नागरी समाज निर्माण झाला. राज्यसंस्था विकसित झाल्या. राज्यसंस्थेच्या उदया बरोबर ते चालविण्यासाठी विविध शासन पध्दतीही अस्तित्वात आल्या. राज्यसत्ता ह्या दीर्घकाळापर्यंत अस्तित्वात होत्या. परंतु त्यातील काही दोषांमुळे त्या हळूहळू मागे पडून, तिथे लोकशाही शासन व्यवस्था विकसीत होत गेली. राजेशाहीत व्यक्तीचे कर्तव्य व हक्क केवळ शासनाच्या आज्ञा पालन करण्यापुरतेच मर्यादित असते. शासन हे जनतेला उत्तरदायी नसते. शिवाय त्यात व्यक्तीचे अभिव्यक्ती स्वातंत्र्यही नाकारले जाते. परंतु जगातील वेगवेगळया राष्ट्रात झालेल्या राज्यक्रांत्यानंतर मात्र नागरिकांच्या हक्कांना महत्व प्राप्त झाले. राजेशाहीतील अधिकारांच्या केंद्रीकरणा ऐवजी, जनतेकडे अधिकारांचे हस्तांतरण होऊ लागलं. मॅग्नाकार्टा सनद, पिटीशन ऑफ राईट्स,फ्रेंच राज्यक्रांती अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहीरनामा ही त्याची काही महत्वपूर्ण उदाहरणं होत, की ज्यामुळे स्वातंत्र,न्याय, समता आदी लोकशाही मूल्यांचं महत्व अधोरेखित झाले.त्यामुळेच आज विविध देशात लोकशाही व्यवस्था अस्तित्वात आली. जनतेच्या अधिकारांची पुर्तता करणारी व जनतेस अधिकार संपन्न बनवणारी शासन पध्दती म्हणून ती आता सर्वमान्य झाली आहे.आज जगातील सर्वच प्रगत राष्ट्रांनी लोकशाही शासनपद्धतीचा अवलंब केलेला दिसून येतो.

बोझंकेच्या मते,"अधिकार म्हणजे शासनाने मान्यता दिलेली व राज्य यांनी अमलात आणलेली मागणी". या सर्व मुलभूत अधिकारामधील स्वातंत्र्याचा व अभिव्यक्तीचा अधिकार याचे महत्व कोणीही नाकारू शकणार नाही. माणसाला समाज व राज्यव्यवस्थेत राहत असताना माहितीचा अधिकार हा देखील तितकाच महत्वाचा अधिकार आहे.

भारताने स्वातंत्र्य प्राप्ती नंतर लोकशाही शासन पध्दतीचा स्वीकार केलेला आहे. या शासन पध्दतीत जनता ही सार्वभौम व सक्षम असते. लोकशाहीतील स्वातंत्र्यासारख्या मूल्याचे महत्व वाढवण्यासाठी आणि त्याला सुरक्षित बनविण्यासाठी नागरिकांना काही अधिकारांची आवश्यकता असते. त्याप्रमाणे भारतीय राज्यघटनेने नागरिकांना काही अधिकार देऊन त्यांना सर्वार्थाने सक्षम बनविण्याचा प्रयत्न केला आहे. एखादे राज्य व्यक्तीला किती आणि कोणते हक्क देते यावर त्या राज्याचे श्रेष्ठत्व अवलंबून असते. प्रा.लास्कीच्या नुसार विशेषतः लोकशाही राष्ट्र आपल्या नागरिकांना विविध हक्कांची उपलब्धी करुन देते. लोकशाही राज्य व्यवस्थेला अधिक सक्षम बनवते. भारतीय घटनेनेही नागरिकांना काही मूलभूत हक्क देऊन त्यांचे सक्षमीकरण तर केले आहेच.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

अलीकडच्या काळातील एक बहुचर्चीत व नाविण्यपूर्ण असा महत्त्वपूर्ण अधिकार म्हणून माहितीच्या अधिकाराची नोंद घेण्यात आली आहे.माहिती अधिकार कायदा हा लोकशाहीतील मोलाचा अधिकार आहे.माहितीचा अधिकार कायदा नागरिकांच्या हातात असलेले ते एक प्रभावी साधन आहे. त्यामुळे त्यांना आपला लोकशाही प्रक्रियेतील सहभाग वाढविणे शक्य आहे. जर व्यक्ती शासन वा प्रशासना विषयी अनभिज्ञ असेल तर तो त्याबाबत आपले मत, प्रतिक्रिया नोंदवू शकणार नाही. आपल्या अधिकारांचे व कर्तव्यांचे पालनही प्रभावीपणे करु शकणार नाही

शासनयंत्रणेतील व्यवहारात पारदर्शकता यावी,भ्रष्टाचाराचे समूळ निर्मूलन व्हावे शासकीय कामाबाबत जनतेला साशंकता वाटू नये त्यांची कामे विनाविलंब,सहजरीतीने व्हावीत यासाठी माहिती अधिकार कायद्याची निर्मिती झाली.

“माहितीचा अधिकार म्हणजे ज्ञानाचा अधिकार” असे समीकरण सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांनी व अनेक कायदे पंडितांनी मांडले आहे. जगातील सामाजिक आर्थिक व औद्योगिक दृष्ट्या विकसित असलेल्या लोकशाही प्रधान देशात माहितीचा अधिकार कायदा खूप पूर्वीपासून लागू झाला असला तरीही भारतात मात्र हा कायदा अस्तित्वात येण्यासाठी बरीच वर्ष वाट पहावी लागली स्वीडन या राष्ट्राने जनतेला सर्वप्रथम माहितीचा अधिकार बहाल केला.

लोकशाही मूल्यांची जोपासना करण्याकरिता सत्तेच्या दुरुपयोगावर प्रभावी नियंत्रण करण्यासाठी प्रशासनाला कार्यक्षम,पारदर्शक व गतिमान बनवण्याकरिता माहितीचा अधिकार महत्त्वपूर्ण आहे. नागरिकांच्या जीविताच्या हक्काला बळकटी आणण्याकरिता प्रशासनात जबाबदारी कार्यक्षमता व परिणामकारकता आणण्यासाठी 12 ऑक्टोबर 2005 रोजी भारत सरकारने माहितीचा अधिकार अधिनियम 2005 लागू केला.

माहितीचा अधिकार कायदा लागू व्हावा म्हणून राज्यातील आणि देशातील अनेक व्यक्तींनी संस्थांनी अथक परिश्रम घेतले.त्यात महिलांचा देखील महत्वपूर्ण सहभाग आहे.याचाच अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत संशोधन विषय निवडला आहे.

**मुख्य शब्द**: माहितीचा अधिकार,महिलांचा सहभाग,MKSS,जनसुनवाई

- **भारतातील माहिती अधिकाराच्या विकासाची पार्श्वभूमी-**
- **ब्रिटीश कालीन ऑफिशियल सिक्रेट अ‍ॅक्ट (गोपनीयतेचा कायदा- १९२३)** :-

भारतावर १५० वर्षापेक्षा जास्त काळ राज्य गाजवणाऱ्या इंग्रज सरकारने भारतीय लोकांना त्यांच्या कार्यपध्दतीबद्दल जाणीवपूर्वक दूर ठेवण्याचा प्रयत्न केला. आणि यातूनच भारतीय जनतेला बंदीस्त ठेवण्यासाठी सन १९२३ साली ब्रिटिशांनी प्रशासनात ऑफीशियल सीक्रेट्स अ‍ॅक्ट (गोपनीयतेचा कायदा) लागू केला. या कायद्या व्यतिरिक्त ब्रिटिश साम्राज्यात सर्वच ठिकाणी वेगवेगळे कायदे अस्तित्वात होते. इंग्रज राज्यकर्ते हे केवळ वसाहतवाद आणि शोषण या हेतूनेच भारतात आले होते. त्यांचे प्रजेशी कोणतेच नाते नसल्याने प्रजेचा खिसा जितक्या बेमालूमपणे कापता येईल तेवढा कापण्याचा प्रयत्न केला. यात त्यांनी कचेरी नावाची बंदिस्त जागेतील दाराआडची कार्यपध्दती स्वीकारली आपले अंतस्थ हेतू समोरच्याला कळू नयेत, यासाठी सर्व कारभाराला गोपनीयतेची झालर चढवली होती आणि या विचारसरणीला गोपनीयतेचा कायदा १९२३ असे म्हटले जाऊ लागले. राज्यकर्त्यांच्या हातातले कागद जनतेला दिसणार नाही हे या


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

कायद्याचे ब्रीद वाक्य होते. भारताव्यतिरिक्त इंग्रजाच्या इतर वसाहतीतही हा कायदा थोड्याफार प्रमाणात अस्तित्वात होता. या कायद्याच्या कलम ५ नुसार,

"If any person, retains the sketch, plan, model, article, note or document in his possession or control when he has no right to retain it, or when it is contrary to his duty to retain it, or willfully fails to comply with all directions issued by lawful authority with regard to the return or disposal there of, he shall be quality of offence under this section."

- **सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांचे निकाल :- (Supreme Court/High Courts judgments) :-**

भारतीय राज्यघटनेतील कलम १९ (१) मध्ये ज्या मूलभूत अधिकारांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यामध्ये सुरवातीला माहितीच्या अधिकार कायद्याला कायदेशीर स्थान प्राप्त झालेले नव्हते. तेव्हा हा कायदा नागरिकांच्या अस्तित्वासाठी कितपत उपयोगी आहे. आणि वेगवेगळ्या न्यायालयात न्याय मिळवण्यासाठी करण्यात आलेल्या नागरिकांच्या याचिका संदर्भात जे विविध निर्णय दिले, त्यात माहितीचा अधिकार किती महत्त्वाचा आहे हे स्पष्ट होते. यामध्ये न्यायालयाने कलम १९(१) मध्येच माहितीचा अधिकार कायदा अंतर्भूत असल्याचे वेळोवेळी दिलेल्या न्यायालयीन निर्णयावरून स्पष्ट केले. न्यायालयाने दिलेले निकाल खालील प्रमाणे आहेत.

- बेनेट कोलमन विरुध्द संघशासन, १९७३
- उत्तरप्रदेश विरुध्द राज नारायण व इतर १९७५
- मनेका गांधी विरुध्द संघशासन, १९७८.
- प्रभा दत्त विरुध्द संघशासन व इतर १९८० .
- एस.पी. गुप्ता विरुध्द संघशासन, १९८२.
- इंडियन एक्सप्रेस न्यूजपेपर्स प्रा. लि. व इतर विरुध्द संघशासन व इतर, १९८५.
- शीला बारसे विरुद्ध भारत सरकार,१९८५
- एल. के. कुलवाल विरुध्द जयपूर महानगर पालिका, १९८६. (८ शीला बारसे विरुध्द महाराष्ट्र शासन, १९८७.
- रिलायन्स पेट्रोकेमिकल्स लि. विरुध्द प्रोप्रायटर्स ऑफ इंडियन एक्सप्रेस न्यूजपेपर्स प्रा.लि. व इतर १९८८
- लाईफ इन्शुरन्स कार्पोरेशन ऑफ इंडिया विरुध्द प्रो. मनुभाई डी. शाह, १९९२.
- सेक्रेटरी, मिनिस्ट्री ऑफ इन्फर्मेशन अँड ब्रॉडकास्टिंग, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया व इतर विरुध्द क्रिकेट असोसिएशन ऑफ बेंगॉल, १९९५.
- टाटा प्रेस लिमिटेड विरुध्द महानगर टेलिफोन निगम लि., १९९५ ...
- दिनेश त्रिवेदी विरुध्द संघ शासन, १९९७. (१४ संघशासन विरुध्द मोशन पिक्चर असोसिएशन, १९९९.
- **माहिती अधिकार विकासात महिलांचा सहभाग**
- **मनेका गांधी विरुध्द संघशासन, १९७८-**


Copyright © | JET Network, All Rights Reserved

या खटल्याच्या निवाड्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने राज्यघटनेतील अनुच्छेद १९ (१) बाबत असे म्हटले आहे की, "भाषण आणि अभिव्यक्ती यांच्या स्वातंत्र्याला भौगोलिक सीमा नसतात. नागरिक माहिती मिळविण्यासाठी आणि स्वतःचे मत व्यक्त करण्यासाठी असा अधिकार कोठेही व केंव्हाही वापरु शकतात."

याचाच अर्थ कोणत्याही क्षेत्राची सीमा भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्याला नाही. नागरिकांना माहिती प्राप्त करण्याचे स्वातंत्र हे कमीत कमी बंधनांनी युक्त आहे. याच प्रकरणामध्ये सर्वोच्च न्यायालयाचे न्या. कृष्णा अय्यर यांनी असे म्हटले आहे की. "जे सरकार गोपनीयतेच्या वलयातच कामकाज करते ते केवळ लोकशाही मूल्याच्या विरोधात काम करते असे नव्हे, तर असे शासन स्वतःच्या कृतीनेच लोकशाही शासनाचे मुल्य संपवत असते.

लोकशाही मुल्यांच्या जपवणुकीत शासनाची भूमिका व जवाबदारी किती महत्वपूर्ण आहे हेच न्यायालयाने या निकालात सांगितले आहे.

या महत्वपूर्ण ऐतिहासिक निर्णयामुळे अनुच्छेद २१ चा विस्तार केला गेला व नव्या न्यायालयीन मार्गाचे स्वागत करण्यात आले की,न्यायालय हे व्यक्तींच्या अधिकारांना संकुचित करण्याऐवजी त्यांचा विस्तार करेल.

- **शीला बारसे विरुद्ध भारत सरकार,१९८५ –**

शीला बारसे या महिला पत्रकार शोधपत्रकारीतेबद्दल आणि समाजसेवेबद्दल सर्वपरिचीत आहेत. त्यांनी ९ सप्टेंबर १९८५ रोजी सर्वोच्च न्यायालयात एक रिट याचिका दाखल केली होती. त्याव्दारे भारतातील विविध राज्यांमधील बालसुधारगृहात डांबून ठेवलेल्या मुलांची, बाल न्यायालयांची, शाळांची माहिती देण्याची मागणी या याचीकेत केली होती. सर्वोच न्यायालयाने भारत सरकार, २४ घटकराज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना या बाबतची माहिती देण्याविषयी नोटीसा बजावल्या होत्या. मात्र १८ जुलै १९८८ म्हणजे तीन वर्षानंतरही केवळ निम्याच राज्यांनी या बाबतची माहिती दिली होती. शेवटी या खटल्याची दीर्घकाळ चालणारी ही सुनावणी पूर्ण करीत न्यायमृतींनी राज्यसरकारला आवश्यक ती माहिती पुरविण्याचे आदेश दिले.

तुरुंगात असणाऱ्या बालकांच्या अधिकाराला ज्याप्रमाणे शाला बारसे यांनी वाचा फोडली त्या प्रमाणेच शासनाकडून एखादी माहिती प्राप्त करणे किती कठीण काम होते हेही सिध्द झाले. जर माहिती अधिकाराचा कायदा नसेल तर सर्वोच्च न्यायालयालाही वारंवार आदेश देऊन जी माहिती प्राप्त करण्यास विलंब लागतो ती माहिती सर्वसामान्य व्यक्तीने मिळवणे किती अशक्यप्राय होऊ शकले हेही दाखवून दिलं.शीला बारसेनी वरील प्रश्नांबरोबरच पोलीस कोठडीत डांबून ठेवलेल्या १५ असहाय्य महिलांच्या मुलाखती घेऊन त्यांना दिल्या जाणाऱ्या वाईट वागणुकीलाही वाचा फोडली. शीला बारसे विरुध्द महाराष्ट्र शासन या खटल्याचा निकाल न्या. भगवती, न्या. पाठक आणि न्या. सेन या तिघांनी दिला. शीला बारसे यांनी केलेल्या याचिकांमुळे समाजसेवकांना तुरुंग, बालूयधारगृहे. किशोर सुधारालये व इतर संबंधित संस्थांना भेटी देऊन त्यांच्याविषयीची माहिती मिळविण्याचा अधिकार प्राप्त झाला.

**स्वयंसेवी संस्थांचा पुढाकार व चळवळी**

- **सामाजिक स्तरावरील प्रयत्न:**

भारतात माहितीच्या अधिकाराच्या विकासाचे दोन महत्वपूर्ण टप्पे आढळतात. त्यातील एक टप्पा म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांनी निर्माण केलेल्या गुप्ततेच्या कायद्यात दुरूस्ती करणे आणि दुसरा


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

म्हणजे स्वातंत्र्योत्तर काळात माहितीचा अधिकार देण्याची मागणी. वृत्तपत्राच्या कायद्यासंदर्भात चौकशी करणाऱ्या समितीने १९४८ साली असे सुचविले होते की, राष्ट्रीय सुरक्षिततेच्या आवश्यकतेसाठी काही बाबी गुप्त ठेवण्यासाठी सुधारणा करावी. मात्र याला नोकरशाहीनेच विरोध केला. त्यामुळे भारताच्या स्वातंत्र्यप्राप्ती नंतरही बरीच वर्षे माहितीचा अधिकार कायदा लागू झाला नव्हता. जनतेला माहितीचा अधिकार हा कायद्याने प्राप्त करून द्यावा हा विचार १९९० नंतर पुढे आला. याचे मुख्य कारण म्हणजे न्यायालयीन निर्णय, बिगर शासकीय संघटना यांच्या कडून करण्यात आलेले प्रयत्न व स्वयंसेवी संस्थांचा पुढाकार या स्वरूपाचे आहे.

सर्वोच्च न्यायालयाने १९७५ साली एका प्रकरणात असे म्हटले की, या देशातील नागरिकांना, शासकीय कर्मचारी यांनी सार्वजनिक क्षेत्रात केलेले प्रत्येक कार्य व त्यांच्याकडून केली जाणारी प्रत्येक कृती जाणून घेण्याचा अधिकार आहे. याचा अर्थ असा की, सर्वोच्च न्यायालयाच्या मते आपल्यासारख्या जबाबदार शासन असलेल्या देशात फारच थोड्या बाबी गुप्त असू शकतात. सर्वोच्च न्यायालयाने माहितीच्या अधिकाराला मूलभूत अधिकाराचा दर्जा दिला असला तरी शासनाची त्यामध्ये उदासीनता दिसून आली. नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे रक्षण करता येईल. यासाठी विविध स्वयंसेवी संस्थानी व चळवळीनी पुढाकार घेतला. "माहितीच्या अधिकाराच्या चळवळीची सुरूवात सर्वप्रथम १९९० मध्ये राजस्थान मधील मजदूर किसान शक्ती संघटन (M.K.S.S.) या स्वयंसेवी संस्थेने सुरू केलेला प्रयत्न हा माहितीच्या अधिकाराच्या लढ्याचा प्रारंभ होता."

माहितीचा अधिकार कायदा व जनलोकपाल चळवळीतील श्रीमती अरुणा रॉय यांचे योगदान अनन्यसाधारण आहे.

**राजस्थान मधील मजदूर किसान शक्ती संघटन (MKSS) व अरुणा रॉय यांचे माहिती अधिकारात योगदान १९९०:**

"हम अपना अधिकार मांगते,
नही किसीसे भीख मांगते,
हमारी संस्था हमारी ताकद,
हमारा पैसा हमारा हिसाब"

असे नारे लावत राजस्थानमधील शेतकरी आणि मजूरांनी 'मजदूर किसान शक्ती संघटन' याव्दारे एक ऐतिहासिक लढा दिला. विशेष म्हणजे राजस्थानमधील ही चळवळ शहरांमध्ये राहणाऱ्या बुध्दिजीवी वर्गाने सुरु केली नव्हती तर गावातील गरीब शेतकरी आणि मध्यम वर्गाने सुरु केलेली होती. पारदर्शकतेसाठीचे हे आंदोलन ग्रामीण भाग वा पंचायती मध्ये विकासकामात होणाऱ्या भ्रष्टाचाराच्या विरुध्द होते.

सन १९७५ मध्ये I.A.S. ची नोकरी सोडून जन आंदोलनाशी आपले नाते जोडणाऱ्या अरुणा रॉय यांनी इसवीसन १९८७ मध्ये मजदूर किसान शक्ती संघटनेचा पाया राजस्थानमधील या देवडुंगरी खेड्यात रचला. “प्रशासकीय सेवेपेक्षा जग खूप मोठे आहे हे माझ्या लक्षात आले.प्रशासनात काम करतांना अनेक नकारात्मक गोष्टी समोर आल्या सेवेत राहून त्यांच्यात सुधारणा करणे शक्य नाही म्हणून बाहेर पडून लढण्याचा निर्णय घेतला.” या त्यांच्या मोठ्या विचारांमुळेच सामाजिक कार्यकर्त्या अरुणा रॉय यांनी I.A.S.ची नोकरी सोडली.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*([https://jetjournal.us/](https://jetjournal.us/))*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

निखिड डे व स्थानिक कार्यकर्ता शंकरसिंह यांच्या मदतीने लवकरच या संघटनेने आपली पकड घट्ट केली. मजुरी, उपजीविकेचे साधन व जमीनी संबंधीप्रश्नावर या संघटनेने राजस्थानमधील खेड्यांमध्ये आंदोलन तीव्र केले. विकासकामामधील भ्रष्टाचार आणि मजुरांना त्यांच्या निर्धारित मजुरीपेक्षा कमी मजुरी देणे यामुळे एकीकडे मजुरांचे आर्थिक नुकसान होत होते तर दुसरीकडे विकासकामात होणाऱ्या भ्रष्टाचारामुळे त्यांच्या जीवनमानाचा स्तर उंचावत नव्हता. या संघटनेने 'अपना गांव अपना काम' या योजनेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विकासकार्यासंबंधातील कागदपत्रांची मागणी करुन या योजनेतील मोठी अनियमितता उघडकीस आणली. एम.के.एस.एस. (मजदूर किसान शक्ती संघटन) ने राजस्थानमधील भूम तहसील भागातील शाळा, छोटी धरणे, दवाखाने याच्या बांधकामा दरम्यान ज्या मजुरांना मजूरी देण्यात आली होती त्यांची यादी असणारे मस्टर रोल (हजेरीपट) व त्या संदर्भातील देयके व प्रमाणकाच्या छायांकित प्रतींची मागणी केली. परंतु अधिका-यांकडून मस्टररोल दाखविण्यास नकार देण्यात आला हा नकारच पुढे माहिती अधिकाराच्या आंदोलनाचे कारण बनला

**National campaign for Peoples Right to Information:**

तिलोनियात समाजकार्य करत असतांनाच संघटना व त्यासाठीचं व्यवस्थापनही अरुणा यांनी आत्मसात केलं होतं. पण आपण ज्यांच्यासाठी काम करत आहोत त्यांचा म्हणजे लोकांचा सहभाग अत्यंत गरजेचा असल्याचंही त्यांच्या लक्षात आलं.

लोकांना त्यांचे घटनात्मक अधिकार मिळवून द्यायचे आणि त्यासाठी लोकसहभागातून संघर्ष करायचा असं त्यांनी ठरवलं होतं. त्यासाठी राजस्थानच्या राजसमंद जिल्ह्यातल्या देवडुंगरी नावाच्या खेड्यातून अरुणा यांचा पुढचा अधिक व्यापक दृष्टीकोन असलेला प्रवास सुरू झाला होता. या दृष्टीकोनातच मजदूर किसान शक्ती संघटना म्हणजेच MKSS च्या स्थापनेची पाळमुळं होती.

या प्रवासामध्ये राजसमंद मधील स्थानिक नेते असलेले शंकर सिंह आणि अमेरिकेहून परत आलेले निखिल डे यांच्या साथीनं त्यांनी हा प्रवास पुढे नेला. 1987 मध्ये या तिघांनी नव्या कामाला सुरुवात केली हो..

त्यानंतर 25 एकर जमिनीवरील त्याच्या कब्जाला आव्हान देण्यात आलं. या लढ्यात गावकऱ्यांच्या साथीनं अरुणा रॉय यांचा विजय झाला. जमीन स्थानिक लोकांना हस्तांतरीत करण्यात आली.

अशाप्रकारे गरीब, शेतकरी, मजूर यांचा आवाज लोकशाही यंत्रणेपर्यंत पोहोचवण्याच्या मूळ उद्देशातून 1 मे 1990 रोजी मजदूर किसान शक्ती संघटनेची (MKSS) स्थापना करण्यात आली.

सोहनगडमध्ये संघर्ष सुरू असतानाच अरुणा रॉय यांना मजुरांना मिळणाऱ्या मजुरीचा मुद्दाही लक्षात येऊ लागला होता. मजुरांना न्याय्य मजुरी का मिळत नाही याचा शोध घेतला असता एकूण यंत्रणेतच त्रुटी असल्याचं त्यांच्या लक्षात आलं. त्यामुळं किमान मजुरीसाठी त्यांनी लढा सुरू केला. त्यातही त्यांना लोकसहभागातून यश मिळवता आलं.

पण या संपूर्ण संघर्षामध्ये लोकांनी केलेलं काम, त्यांना ठरलेली मजुरी, सरकारचे नियम, दिल्या जाणाऱ्या पैशाच्या नोंदी, बिलं अशा अनेक कागदपत्रांची गरज भासत होती. पण ही कागदपत्रं मिळवण कठीण होत. सर्वाधिक संघर्ष त्यासाठी करावा लागत होता.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

यातून MKSS संघटनेला जाणीव झाली की, अशा प्रकारची माहिती मिळणं गरजेचं असतं आणि तो लोकांचा अधिकारही असतो. यातूनच पुढं माहितीचा अधिकार सारख्या कायद्याची संकल्पना पुढं आली आणि संपूर्ण देशातील सामान्य नागरिकांना या कायद्याच्या रूपानं एक मोठं शस्त्र मिळालं.

**माहिती अधिकार कायद्याचा संघर्ष व जनसुनावणी**

मजुरांना त्यांच्या हक्काचं वेतन न मिळणं हा मुद्दा या भागातील अत्यंत मोठा मुद्दा होता. MKSS ने हा मुद्दा चांगलाच लावून धरला होता. अशा प्रकारच्या अन्यायाच्या विरोधात आंदोलनं आणि उपोषणं करत त्यांनी प्रशासनानं लक्ष याकडं वेधलं. तसंच जनसुनावणीच्या प्रयोगांतून हा मुद्दा अत्यंत वेगानं सोडवला.

MKSS च्या जनसुनावणीत गरीब, मजूर किंवा शेतकरी त्यांच्या अडचणी संघटनेसमोर मांडून त्यासाठी मदत मागत होते. जनसुनावणीत समोर आलेले मुद्दे सोडवण्याचे प्रयत्न करत असताना एक अत्यंत महत्त्वाचा मुद्दा MKSS च्या लक्षात आला.

अनेकदा मजुरीच्या बाबतीत मजुरांवर अन्याय व्हायचा. एखाद्याला कमी मजुरी दिली किंवा मजुरी देणं नाकारलं जायचं. पण अशा वेळी त्यानं केलेलं काम किंवा त्याला किती मजुरी दिली जावी याबाबतचे निर्देश असलेली कागदपत्रेच अधिकारी देत नव्हते. मग काहीही सिद्ध कसं करायचं? हा मोठाच प्रश्न निर्माण व्हायला लागला होता.

राजस्थानच्या कोट किराणामध्ये 2 डिसेंबर 1994 ला पहिली जन सुनावणी झाली. त्यात असाच एक मुद्दा एका मजुरानं उपस्थित केला. MKSS नं त्यासंबंधीची कागदपत्रं देण्यास सरपंच आणि सचिवांनी नकार दिला. पण एका बीडीओनं ती कागदपत्रं संघटनेला दिली. त्यातून बऱ्याच अनागोंदी समोर आल्या आणि त्या थेट लोकांसमोर जाहीरही करण्यात आल्या.

हळूहळू या भ्रष्टाचाराविरोधात लोक बोलू लागले. अधिकारी लोकांना बोलू नये म्हणून दारु वाटू लागले. पण ठिणगी पेटलेली होती. अखेर या प्रकरणी झालेल्या भ्रष्टाचार प्रकरणी एफआय आर दाखल झाली. पण पैशासाठी साक्षीदारांना जबाब बदलला आणि अधिकारी सुटले.

नंतर अशाप्रकारच्या जनसुनावणींची संख्या वाढली. यातून अनेक प्रकरणं समोर येऊ लागली. पण सार्वजनिक यंत्रणांना कागदपत्रं किंवा माहिती देणं बंधनकारक नसल्यानं MKSS ला माहितीचा अधिकार असणं गरजेचं असल्याची जाणीव झाली. त्यातूनच त्यांनी या कायद्याची मागणी सुरु केली होती.

अखेर राजस्थानातील बीवार या गावात MKSS ने ४० दिवस धरणे आंदोलन केलं. संपूर्ण देशाचं लक्ष याकडं वेधलं गेलं. ग्रामीण भागाबरोबरच शहरी वर्गातून या आंदोलनाला पाठिंबा मिळू लागला. राज्यभरातील लोक बीवारला येऊन आंदोलनाला पाठिंबा दर्शवू लागले. पत्रकार, कलाकार, वकील यांचं लक्ष इकडं वेधलं

अखेर या संघर्षाला यश आलं आणि 1997 मध्ये पंचायत मंडळ नियमांत बदल करण्यात आले. त्यामुळं हव्या असणाऱ्या माहितीची फोटोकॉपी देण्यास सरकारनं तयारी दर्शवली होती. नंतरच्या सातत्याच्या पाठपुराव्यानं 2000 साली राजस्थानात माहिती अधिकार कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली.

जेव्हा माहितीच्या अधिकाराची गरज जनतेला भासली तेव्हा राजस्थानमधील सरकारने माहितीच्या अधिकाराचा कच्चा मसुदा तयार केला, तेव्हा या संघटनेने राजस्थामधील पाच विभागीय


Copyright © | JET Network, All Rights Reserved

कार्यालयांची दखल घेतली. त्यामध्ये त्यांनी पथनाट्य, लोकांचा संबंध वाढवणे अशा वेगवेगळया बाबींद्वारे माहितीच्या अधिकाराचे महत्त्व स्पष्ट केले. माहितीच्या अधिकाराची गरज किती आहे हे शासनाला पोस्टकार्डद्वारे कळविले. यामध्ये त्यांनी जो संदर्भ वापरला होता तो राज्यसरकारला चालना देणारा ठरला. यामध्ये लोकांचा प्रत्यक्ष सहभाग झाल्यामुळे आणि अधिकाराबाबत संदर्भ : "Buy a post card address it; Post it; put it in your vote for a right to Information Act"

पुढं सगळयाच राज्यांमधून याची मागणी सुरू झाली. देशभरात या कायद्यासाठी मोठी आंदोलनं झाली आणि अखेर 12 ऑक्टोबर 2005 साली संपूर्ण देशात माहिती अधिकार कायदा लागू करण्यात आला. छोट्याशा गावातून अरुणा यांनी गरीब, मजूर यांच्यासाठी सुरू केलेल्या कामाचं रुपांतर भ्रष्टाचार रोखण्यासाठी सर्वात महत्त्वाचं शस्त्र ठरणाऱ्या कायदा निर्मितीत झालं.

**सारांश**

माहितीच्या अधिकाराची पार्श्वभूमी लक्षात घेतली तर 'स्वीडन' देशात जन्मास आलेल्या माहिती अधिकार कायद्याचे आज विविध राष्ट्रात एका मोठ्या वटवृक्षात रूपांतर झाल्याचे स्पष्ट होते.माहितीच्या अधिकारामुळेच शासन पद्धतीत पारदर्शकता येऊन ते जनतेप्रती उत्तरदायी राहते.लोकशाही रुजवणे हेच या कायद्याचे ब्रीद आहे.परंतु माहितीचा अधिकार हा सर्वसामान्य जनतेला एकाएकी मिळालेला अधिकार नाही तर त्यामागे खूप मोठा संघर्ष आहे.त्यात अनेक व्यक्तिगत, सामाजिक,राष्ट्रीय पातळीवरील चळवळी आहेत.त्यात महिलांचे योगदान देखील खूप मोठे आहे. कारण भारतात स्वातंत्र्यपूर्व काळापासून महिलांचे समाजाप्रती योगदान राहिलेले आहे. अगदी अनादिकाळातमी गार्गी,मैत्रेयी,सुलभा,कात्यायनी या स्त्रिया ब्रह्मवादिनी होत्या.इतिहासकाळात जिजाबाई,ताराबाई,अहिल्याबाई,राणी लक्ष्मीबाई इ.राजघराण्यातील स्त्रियांनी लढा दिला.मध्ययुगात मुक्ताबाई,जनाबाई,विठाबाई,कान्होपात्रा इ.संत स्त्रियांनी अभंग रचनेतून जनजागृती केली.स्वातंत्र्यपूर्व काळात देखील सावित्रीबाई फुले,फातिमा शेख इ. महिलांनी शिक्षणाचा प्रचार,प्रसार केला.अम्मू स्वामिनाथन,दक्षायानी वेलायुद्धन,बेगम एजाज रसूल,दुर्गाबाई देशमुख,हंसा मेहता,कमला चौधरी सरोजिनी नायडू,सुचेता कृपलानी इ.महिलांचा संविधान निर्मितीतीत मोलाचा वाटा आहे.माहितीचा अधिकार कायदा निर्मितीत देखील मेनका गांधी,शीला बारसे,अरुणा रॉय यांचे फार महत्वपूर्ण योगदान आहे.माहितीच्या अधिकाराचा मूळ लढा MKSS मजदूर किसान शक्ती संघटनेने प्रारंभ केला ज्याचे नेतृत्व श्रीम.अरुणा रॉय यांनी केले.

एकंदरीतच, भारतातील माहिती अधिकार विकासाचे स्वरूप पाहिल्यास आपणास असे दिसून येते की,माहिती अधिकार विकासाच्या विविध टप्प्यांमध्ये महिलांचा सहभाग दिसून येतो.M.K.S.S.संघटनेचा तर या कायद्याच्या निर्मितीमध्ये सिहाचा वाटा आहे.असे असले तरी या कायद्याचा वापर करणाऱ्या महिलांचे प्रमाण मात्र कमी आहे.ते जवळपास ९% आहे.

लोकशाहीच्या सुदृढ वाढीसाठी व व्यापकतेसाठी माहिती अधिकार कायद्याची महिलांमध्ये अधिक जनजागृती व्हायला हवी.

**संदर्भ**

१. माहितीचा अधिकार कायदा, य. दि. फडके २००२
२. माहितीचा अधिकार अधिनियम २००५- रमेश बालवाड


Copyright © | JET Network, All Rights Reserved

३. कायदा माहितीचा अन अभिव्याक्तीस्वतांत्र्याचा-प्रल्हाद कचरे, शेखर गायकवाड य. च. विकास प्रबोधिनी, पुणे २०२२
४. पाटील व्ही.बी. - माहितीचा अधिकार अधिनियम, २००५
५. माहितीचा अधिकार अधिनियम ,२००५- यशदा
६. राजनीति विज्ञान-नागेंद्र प्रताप सिंह, अजीत कुमार, अशरफ जमन
७. www.rti.gov.in
८. www.rti.maharashtra


Copyright © | JET Network, All Rights Reserved